ISSN 0976-2957

साहित्य, कला, संशोधन व परिवर्तनवादी पुरोगामी विचाराशी बांधिलकी ठेवणारे त्रैमासिक

# अक्षरगाथा

वर्ष : तेरावे । अंक : दुसरा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२






Scanned with OKEN Scanner

# देशोधडी : भटक्या-विमुक्तांच्या अर्थविश्वाची उकल करणारे आत्मचरित्र

प्रा. सुभाष भोसले
अर्थशास्त्र विभाग, आर. एन. सी. आर्ट्स, जे. डी. बी. कॉमर्स आणि
एन. एस. सी. सायन्स कॉलेज, नाशिक. भ्र. ९८५०४५२९९१

भारतीय समाजरचनेत सर्वात खालच्या स्तरावर आदिवाशी, गुन्हेगार जाती व भटक्याजमाती या सर्वात उपेक्षित आणि वंचित असलेल्या आहेत. भारतात १६ ते २० कोटी लोकसंख्या असलेल्या भटक्या आणि विमुक्तांच्या विषयाची आलेले जे आर्थिक अभ्यास आहेत, ते भटक्याचे दारिद्र्याचे वर्णन करणारे राहिलेले आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनाची स्थिती खरोखरच अत्यंत बिकट आहे. त्यांच्या बाबतीत योग्य घटनात्मक तरतुदींची अंमलबजावणी ही त्यांच्या जीवनावर विशेष परिणाम न करता काही जुजबी या सुधारणा करणारी ठरली आहे, हे रेणके आयोगाने(२००६) अधोरेखित केले.

रेणके कमिशन (२००६), टेक्निकली ॲडवायझरी ग्रुपचा रिपोर्ट (२००६), इधाते कमिशन (२०१७) करणाबिरण यांचा रिपोर्ट (२०१७) यात भटक्यांच्या अर्थविश्वाचे बोलके चित्रण आलेले आहे. महाराष्ट्रातील भटक्या विमुक्ताविषयी जे काही थोडे अभ्यास झालेले आहेत, त्यातही भटक्यांचे अर्थविश्व मांडताना त्यांनी हा समाज शिक्षण, आरोग्य व मुख्य उत्पादनाच्या साधनांपासून वंचित असल्यामुळे त्यांचे अर्थविश्व भग्नच असल्याचे दिसते. असे अधोरेखित केले आहे. भटक्या आणि विमुक्तांच्या काही लेखकांनी स्वतःच्या जीवनाचा इतिहास लिहिताना या भग्न आर्थिक जीवनाला वेळोवेळी अधोरेखित केल्याचे दिसते. या आत्मकथनातून भटक्यांचा भग्न आर्थिक संसार आपणाला उलगडताना दिसतो. यात नारायण भोसले यांचे 'देशोधडी : अड,मेडी बारा खुट्याची' या आत्मकथनात सविस्तर नाथपंथी, डवरी गोसावी या भटक्या जमातीच्या अर्थविश्वाची चर्चा आलेली आहे. नाथपंथी, डवरी गोसावी जमातीच्या एकूण जगण्यातील वा वापरातील अनेक वस्तूंचा उल्लेख आलेला आहे. आवश्यक असलेल्या घराचे-झोपडीचे वर्णन करताना देशोधडीला लागलेल्या बिराडाचे वर्णन करताना लेखक म्हणतो, 'आम्ही एका खोपटात राहत असू. अशीच खोपटं बाकीच्या बिऱ्हाडांची होती. चार-पाच टीनचे पत्र उभं केलेलं. दोन चार वासे उभं केलेलं. गुडघ्या एवढ्या मातीच्या भिंती म्हणजे घर. आमचे घर म्हणजे काय, तर दहा बाय दहा फुटाचा घेरा. त्यात गावठी मातीच्या गुडघ्या एवढ्या भिंती, भिंतीच्या दोन्ही बाजूंना लिंब-बाभळीच्या, लिंबाच्या बिळकीच्या दोन ढेपा व त्याच लाकडाचे त्यावर अंथरलेले वासे. त्यावर गव्हाचे तणस अंथरलेलं म्हणजे शाकारलेलं. दाराची चौकट साडेतीन-चार फुटी उंच नसलेली आणि अडीच पावणे तीन फूट रुंद नसलेली असे. जाता येता अंग चोरून आणि वाकूनच जावे लागे. नाहीतर कपाळ मोक्ष व अंग मोक्ष ठरलेला. अशी कपाळ अंग मोक्ष घर असलेली आमची जमात आणि लोक. येता जाता वाकूनच जायचं आणि वाकूनच यायचं अशीच शिकवण या घरच्या चौकटी आम्हाला देत होत्या. या चौकटीत आम्ही वाकून येऊनजाऊन मोठं होत होतो. अशा खुजा चौकटीत



Scanned with OKEN Scanner

 ISSN : 0976-2957

भटक्यांची आणि आमची बिऱ्हाड मोठी होत होती.' (पृष्ठ- १८)

भटक्या जाती जमातीची जमिनीची भूक अनन्य आहे. घर बांधण्यासाठी जमीन घेणे, दोन घास खाण्यासाठी जमीन घेणे, असे सीमित का होईना प्रयत्न भटक्याकडून झाले आहेत. परंतु या जमिनी पडीक वा नापीक असत. लेखक पुढे लिहितो, '... पण शेती कसण्यासाठी करण्यासाठी नांगर, बैल, बी-बियाणं नसणं, अन्य अवजार ती अवजारे चालवण्याचे ज्ञान शेतीचे नसणं, निसर्गचक्र ऊनपावसाचा अंदाज रोगराईचे असलेले ज्ञान परंपरेने आजोबाला आणि आजीला आणि बिराडाला नव्हते. पण भविष्यात कोणीतरी स्थिर व्हावे किंवा होईल, असा त्यांचा मानस असावा' (पृष्ठ- १९) लेखक पुढे म्हणतो, 'लक्ष्मण पंजोबाच्या हयातीत आजोबांनी शेती विकत घेतली होती. त्यांनी शेती करण्यास सुरुवात केली खरी, पण बिगर पाण्याची नापीक शेती, शेजारच्या शेतकऱ्याकडून त्रास, धान्य खुडून नेणाऱ्या चोरांचा त्रास, सततची दुष्काळी स्थिती, दुष्काळात जगण्याचा भौतिक अवकाश नसल्याने आजोबा-पंजोबा पुन्हा भरकटले. त्यातच कुटुंबाला भिक्षेकरी जीवनाची सवय असल्याने त्यांचा भिक्षेकरी जीवनाच्या बाजूला कल वाढत गेला. किमान चार महिने तरी भिक्षा मागण्यास आमच्या जमातीचे लोक जाऊ लागले. (पृष्ठ-२०)

उद्योगधंदा करण्याचे कोणतेही शिक्षण नसलेल्या या भटक्या जमातीचे लोक व्यवसाय करत नव्हते, अशातला भाग नाही. परंतु त्यासाठीचे प्रशिक्षण मात्र यांना नव्हते. असेच या आत्मकथनातून दिसते. लेखकाच्या आजोबाने गाई-बैल विकण्याचा व्यवसाय सुरू केला. व्याजाने पैसे उसने काढून व्यवसाय केला होता. परंतु या त्यांना कमालीचा तोटा झाल्याने हा व्यवसाय असाच वाऱ्यावर सोडून देऊन पुन्हा भिक्षेकडे वळावे लागण्याचे लेखक नोंदवतो. हे कर्ज फेडण्यासाठी लेखकाचे वडील आणि चुलते यांनी भारतभर भ्रमंती केली. भिक्षा मागितली. भिक्षेचे साधन म्हणून गाई निवडल्या. एकेक घर मागत मागत त्यांनी चार वर्षांमध्ये वडिलांनी काढलेले कर्ज फेडले. कर्ज फेडताना झालेला त्रासही लेखकाने यात मांडलेला आहे. टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी भारतातील प्रत्येक राज्यातील गाव न गाव लेखकाच्या आई-वडिलांना आणि नातेवाईकांना भिक्षा मागत मागत पादाक्रांत केल्याचे अनेक वर्णने यात आलेली आहेत. आर्थिकदृष्ट्या आत्यंतिक विकलांग असलेल्या या लेखकाच्या भटक्या कुटुंबाला भारतभर भटकताना वेगवेगळ्या प्रकारच्या संशयाला बळी पडावे लागले आहे. आणि अनेकांचे जीवही यात गेलेले आहेत. लेखकाच्या आजोबाचा मृत्यू, पाण्याच्या घोटासाठी झालेला मृत्यू, नातवाच्या तहानेसाठी झालेला मृत्यू, मनाला चटका लावताना त्यांचे आर्थिक भावविश्व उघडे करून दाखवतो.

भटक्यांनी भिक्षेसाठी व राहण्यासाठी निवडलेली गावे, ही अनन्य अशीच असत व त्या ठिकाणी ते करत असलेला व्यवसायही विशिष्ट असे. निवडलेल्या गावाविषयी लेखक म्हणतो, 'बामणी मध्ये नदी आहे म्हणजे पाणी आहे व पाणी आहे म्हणजे बारमाही मासे, खेकडे पकडता येतील, खाता येतील. असं म्हणून आमची जमात या गावात थांबली असावी. या मासे खेकड्यामुळेच एकेक बिराड एकमेकांच्या साहाय्याने येथे वसत गेले असले पाहिजे. दिवसभर डोहात कालवणापुरतं खेकडे मासे पकडायचं. एरवी माशाचं जाळं कांड्याळ विणायचं. त्यासाठीचा दोरा आणण्यासाठी कुठल्यातरी शहराचा दौरा करायचा. असं आमच्या जमातीत काहीतरी सुरू असायचं, पण एवढे खेकडे, मासे सापडूनही त्याचा व्यापार मात्र कोणी केल्याचे ऐकिवात नाही.' (पृष्ठ-२०)

भारतातील प्रांतोप्रांती फिरताना लेखकाच्या आई-वडिलांना करावा लागलेला हा सक्तीचा प्रवास, रेल्वेचे तिकीट न काढता टीसीकडून होणाऱ्या छळाचा इतिहास यात मांडण्यात आलेला आहे. लेखकाची आजीने गाण्यातून मांडेला आर्थिक विचार फार महत्त्वाचा आहे. 'कशासाठी पोटासाठी' हे गीत आपण ऐकलं



Scanned with OKEN Scanner

ISSN : 0976-2957



असेलच. याच धरतीवर लेखकाची आजी म्हणते,

'कसलं हे पोट कशाने हे भरतं, जन्माचे घरटे कशाने ते बनतं. माड्यावर माड्या कैकांच्या चढल्या. पिकावर पीक राशी कशा वाढल्या. कुण्या धरणाचे पाणी कुण्या दांडाने वाही. माझ्या का शिवारी ईत ईत भेग बाई. कोणीतरी चोर कोणीतरी ठग, आम्हासही लागला गैरविश्वासाचा रोग. फुलांची सेज अंतराच्या फायात, चंदनाचं शरण तिथे, राखेलच्या धुरात मरण येथे. कुठवर उपटावर रोपट, कुठे चिटकवावं. कसा येईल भर त्याला अधांतरी या जन्माला. रात्रकाळी अंधार काळा, दिसही काळा, अंधारलेल्या सूर्याचा. संर्ध कष्ट आणि मिळकतीच्या मधला सारा प्रवास सारा.' या ओळी नाथपंथी-डवरी गोसावी समाजाचं भग्न आर्थिकविश्व विश्लेषित करतं.

टिचभर पोटासाठी फिरफिर फिरणारी ही भटक्यांची बिऱ्हाड भिक्षेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे शोध लावत गेले. कधी खिलारी गाईवर, कधी पाचसहा पायाच्या गाईवर, कधी दुर्गामाता, अंबामाता, रेणुका माता, काळुबाई, साईबाबा यांच्या मूर्तीवर. कधी हिजड्याच्या वेशात, कधी बहुरूपीच्या रूपात भीक मागत, टीचभरही पोट भरू न शकलेल्या भग्न आर्थिक जीवनाची चित्रण यात पानोपानी आलेली आहेत.

भारतभर भ्रमंती करूनही कमालीचे ज्ञान मिळवणाऱ्या या भटक्या जमातीच्या ज्ञानाचा आर्थिकतेत रूपांतर होत नाही. हे लेखक आपल्याला वारंवार स्पष्ट करून सांगतो. दुष्काळी स्थितीत तर या भटक्यांचे भग्न विश्व आणखीनच भग्न होते. त्यात पारू आक्काची अन्नअन्न करून मेलेली दोन मुले, मनाला चटका लावून जातात. शाळा शिकताना फुटलेली पाटी पुन्हा घेण्यास लेखकाकडे पैसे नाहीत, शाळेचा गणवेश नाही, पाठीवरची पेन्सिलही विकत घेण्यास परवडणारी नाही, रात्रीचा अभ्यास करण्यास दिव्यामध्ये रॉकेल नाही, हरवलेले पुस्तक पुन्हा घेता येत नाही, आजारी माणसाला दवाखाना पाहता येत नाही, अंगभर वस्त्र मिळत नाही, स्त्रियाही एका वस्त्रात आणि पुरुषही एका वस्त्रात. मुलं तर नागडी उघडीच.. अशा आर्थिक परवडी या आत्मकथनात आपणाला पानोपानी दिसतात.

'अड, मेडी आणि बारा खुट्याला' संपत्ती मानणाऱ्या नाथपंथी-डवरी गोसावी जमातीच्या आर्थिक विवेंचनेचा इतिहास लेखकाने सक्षमपणे मांडला आहे. चिकन- मटणाचा टाकलेला टाकाऊ हिस्सा हेच या जमातीचा मांसाहार! फोडणीला तेल तिखटही नसलेली यांची भाजी! ही वर्णन भटक्यांच्या आर्थिक विवेंचनेची साक्ष देतात. लेखकाने भोगलेल्या विविध अवस्था, घराच्या संधी-कोपऱ्यात- बोळात उंदराने पळवलेल्या भाकरीच्या तुकड्यावर लेखक आणि त्याची भावंडं जगतात. शाळेत मिळालेली सुकडी यांना पंचपक्वान्नापेक्षा चविष्ट वाटते. बोर्डिंगमध्ये शिळ्या भाकरी आणि आळ्या-जाळ्याची भाजी यांना चविष्ट वाटते. धनिकांच्या दयेवर जगणारी बिऱ्हाडं आणि त्यातील माणसाच्या कथेने हे आत्मकथन गच्च भरलेला आहे. शकुन अपशकुनाच्या फेऱ्यात अडकलेली ही जमात नवसाचा भडिमार करते आणि नवस फेडण्यात आयुष्यभर कमावलेली कमाई घालवते. याविषयीची वर्णनं मुळातून वाचण्यासारखी आहेत.

आर्थिक विवंचनेत अडकलेल्या समुदायातील संघर्षसुद्धा पराकोटीचा असतो. यासाठीही ते पोलीस आणि कोर्टकचेरी यात आपली आयुष्याची मिळकत घालून बसतात. याचेही चित्रण लेखकाने केले आहे. नाथपंथी साधूच्या वेशात भिक्षा मागणाऱ्या या जमातीचे मोठमोठ्या साधूच्या आखाड्याशी वादविवाद होत. आखाड्याची जमीन आणि त्यावर मिळणाऱ्या बिदागीवर सांडा सारखे माजलेले ते आखाड्याचे साधू लेखकाच्या जमातीला मात्र पाण्याचा साधा घोटही देण्यास तयार नसतात, हेही लेखकाने स्पष्टपणे सांगितले आहे. रेशनचं कदान्न आणि लिंबाच्या लिंबोळ्या खाऊन लेखकाने आपले उच्च शिक्षण पूर्ण केले आणि प्राध्यापक होण्यापर्यंतची मजल मारली, त्याचा आर्थिक इतिहास या आत्मकथनात आलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

 ISSN : 0976-2957

**सारांश:**

एकंदरीतच भटक्या विमुक्तांच्या साहित्याची प्रेरणा ही त्यांच्या जगण्यातील वास्तविक अनुभवातून आलेली आहे. शेकडो वर्षे ज्यांना मुख्य समाजाकडून नाकारण्यात आले, त्यांना नाकारण्याच्या विविध मार्गाचा उल्लेख त्यांच्या लिखाणातून प्रतिबिंबित झालेला दिसून येतो. नारायण भोसले यांच्या आत्मचरित्रपर लिखाणात त्यांच्या जातीच्या जगण्याचे वास्तव ते त्यांच्या अनुभवातून आलेले आहे. ते त्यांचा सामाजिक स्तर सांगताना उत्पादक घटकाच्या मालकीच्या बाबतीत ते कोणत्या स्थितीत आहेत, हे ओघाने सांगतात. हे सांगताना ते कोणत्याही मानवी विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या घटकांकडे म्हणजे इतिहासातील स्थानाचे अडथळे, त्यांच्या घराची स्थिती, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न , भुकेचे प्रश्न, आरोग्याचे प्रश्न, इ. बाबीकडे ते आपलं लक्ष वेधतात.

**संदर्भ :**


1) Government of India. (2017). Report of the National Commission for Denotified Tribes, Nomadic and Semi-Nomadic Tribes (Idate Commission)

२) Government of India. (2008). Report of the National Commission for Denotified Tribes, Nomadic and Semi-Nomadic Tribes (Renake Commission). Vol. I II. New Delhi: Ministry of Social Justice and Empowerment, Government of India.

३) नारायण भोसले (२०२१): 'देशोधडी : आडं, मेडी, बारा खुट्यांची', मनोविकास प्रकाशन, पुणे.

४) लक्ष्मण माने (१९९७) : 'विमुक्तायन महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : एक चिकित्सक अभ्यास', यशवंत चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.


५) Uma Kapila (2013) "Indian Economy: Performance and Policies, Academic Foundation, New Delhi.


**देशोधडी : आडं, मेरी, बाराखुट्यांची**
**नारायण भोसले**
मनोविकास प्रकाशन, पुणे
प्रथमावृत्ती : ऑक्टोबर २०२२
पृष्ठे : ३०६, मूल्य : ३५०

■


## अक्षरगाथाचे संग्राह्य विशेषांक


**कुळवाडीभूषण छत्रपती शिवराय विशेषांक**



**कादंबरी विशेषांक**




**वर्तमान समाज आणि माध्यमे विशेषांक**






Scanned with OKEN Scanner